क्र.प्रविनि-२६.०५/महाराष्ट्र माहितीचा अधिकार/१८८७/२००५/प्र

विमा संचालनालय
महाराष्ट्र राज्य,
गृहनिर्माण भवन, (म्हाडा),
पहिला मजला, रुम नं.२६४,
कलानगरसमोर, वांद्रे (पूर्व),
मुंबई-४०० ०५१

संदर्भ : १) या कार्यालयाचा कार्यालयीन आदेश क्र. प्रविनि-२६०३/महाराष्ट्र माहितीचा अधिकार/ २९२९/२००३/प्र, दि.१२.२.२००३.

२) या कार्यालयाचा कार्यालयीन आदेश क्र. प्रविनि-२६०४/महाराष्ट्र माहितीचा अधिकार/ १५५८/२००४/प्र, दि.११.८.२००४

३) या कार्यालयाचा कार्यालयीन आदेश क्र.प्रविनि-२६०५/महाराष्ट्र माहितीचा अधिकार/ १४०३/२००५/प्र, दि.१६.७.२००५

## कार्यालयीन आदेश

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार, अधिनियम २००५ अंतर्गत सहाय्यक माहिती अधिकारी, शासकीय माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांच्या नव्याने नियुक्त्या करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे यापूर्वी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ नुसार संदर्भ क्र.२ येथिल दि.११.८.२००४च्या कार्यालयीन आदेशान्वये विमा संचालनालयात नियुक्त करण्यात आलेल्या शासकीय माहिती अधिकारी व अपीलिय प्राधिकारी यात बदल करुन, केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार सुधारीत आदेश आता निर्गमित करण्यात येत आहेत.

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५(२) नुसार माहिती प्राप्त करुन घेण्याकरीता  या अधिनियमतील तरतूदी अंतर्गत नागरिकांकडून येणारे अर्ज/अपिलीय अर्ज स्विकारुन ते संबंधित शासकीय माहिती अधिकारी/शासकीय अपिलीय प्राधिकारी यांना आवश्यक कागदपत्र/माहितीसह उपलब्ध करुन देण्याकरीता, श्री.प्र.मा.सरदार, कनिष्ठ तांत्रिक अधिकारी यांना “सहाय्यक माहिती अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५(१) नुसार विमा संचालनालयामध्ये हाताळण्यात येणाऱ्या विषयांबाबतची माहिती या अधिनियमातील तरतूदींअंतर्गत नागरिकांना उपलब्ध करुन देण्याकरीता, श्री.लि.मो.खान, सहाय्यक विमा संचालक यांना “शासकीय माहिती अधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ नुसार नागरिकांकडून प्राप्त होणा-या अपिल अर्जांवर कार्यवाही करण्याकरीता मा. संचालक यांना “शासकीय अपिलीय प्राधिकारी” म्हणून घोषित करण्यात येत आहे.

उपरोक्त शासकीय सहाय्यक माहिती अधिकारी, शासकीय माहिती अधिकारी व शासकीय अपिलीय प्राधिकारी यांनी केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलमांचे काटेकोरपणे पालन करावे.

( अ.के.अभंग )
विमा संचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

ब. सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी

| अ.क्र | सहाय्यक शासकीय माहिती अधिकारीचे नांव | पदनाम | कार्यक्षेत्र | पत्ता/फोन | ई-मेल |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.प्र.मा.सरदार, (प्रशासन) | कनिष्ठ तांत्रिक अधिकारी | महाराष्ट्र राज्य | विमा संचालनालय,<br>२६४, म्हाडा, कलानगर समोर,<br>बांद्रा (पू), मुंबई ५१<br>फोन: २६५९०४०३ | Abhang123@ rediffmail.com |